# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २७९/२०१९ नि.१ वर आदेश

अर्ज वाचला. अर्जदार तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. सहा. सरकारी अभियोक्ता हजर. प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे एमआयडीसी पोलिस स्टेशन पो. र. नं. ३५६/२०१९ मधील अर्जदार यांचा सॅमसन कंपनीचा मोबाईल व मोटर सायकल क्र.एमएच ५० इ ३७४४ या गाडीचा ताबा मिळणे करीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. या अर्जाचे कामी सामनेवाला यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले केले व मोबाईल फोन व मोटर सायकल ही अर्जदारचे ताब्यात देण्यास हरकत नसल्याचे नमूद केले. अभियोग पक्षातफे म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अर्जदार यंच्या ताब्यातून मोबाईल व गाडी जप्त करण्यात आली आहे. गाडीचे कोणतेही कागदरत्र हे अर्जदार यांचेकडे नाही. कागदपत्राशिवाय गाडी अर्जदार यांना देणे योग होणार नाही. अर्जदार यांच्या ताब्यातून जप्त केलेला मोबाईल हा त्यांना देणे योग्य होणार आहे. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

—:— **आ दे श** —:—

१. अर्ज अशत: मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांना गाडीबाबत ताबा नाकारण्यात येत आहे.

३. जप्त मुददेमाल ओपो कंपनीचा सॅनसग मोबाईल अर्जदार यांना खालील अटींची पुर्तता केल्यावर अर्जदारचे ताब्यात देणेत यावा.

अ) अर्जदारने रक्कम रु.५,०००/— (रक्कम पाच हजार मात्रचे) बंधपत्र द्यावे.

ब) अर्जदार वर नमद मोबाईल हॅण्डसेट मध्ये त्रयस्थ इसमाचा हक्क प्रस्थापित करणार नाही अथवा सदर वर नमूद मुददेमाल अन्य कोणासही विकणार नाही व मे.न्यायालय आदेश करेल त्या त्या वेळेला न्यायालयात हजर करील असे हमीपत्र लिहून द्यावे.

क) या अर्जातील आदेश व कागदपत्रे जयसिंगपुर गु. र. नं.३५६/२०१९ या गुन्हयाचेकामी दोषारोपपत्र दाखल झालेनंतर दोषारोपपत्राला जोडणेत यावेत.

ड) जप्त मोबाईल फोन अर्जदार यांचे ताब्यात देण्यापूर्वी त्यांचे दोन रंगीत फोटोग्राफ अर्जदार यांनी तपासीक अधिकारी यांना बधपत्रासोबत दयावेत.

इ) सदरचे बंधपत्र हे तपासीक अधिकारी यांचेसमक्ष पुर्ण करावे. या आदेशाची प्रत संबधित पोलिस स्टेशन ऑफिसर यांना पुढील पुर्ततेसाठी पाठविणेत यावी.

सही/—

जयसिंगपूर
दिनांकः—१८.११.२०१९

(अे. बी. रेडकर )
न्याय दंडाधिकारी, वर्ग १ जयसिंगपुर